**राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत मौजे आगरनळ, ता. जि. रत्नागिरी येथील आगरनळ धनगरवाडी तलाव संवर्धन प्रकल्पास निधी वितरीत करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः रासयो-२०२४/प्र.क्र.६०/तां.क.३**
नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०९ ऑक्टोबर, २०२६

वाचा :-

१) पर्यावरण विभाग विभाग शासन निर्णय क्र.इएनव्ही २००८/प्र.क्र.६९/तां.क.३, दि.२७.०८.२००८

२) पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय, दि.१३.०३.२०२४

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्याकडून दि.१९.०३.२०२४ रोजीच्या पत्रासोबत प्राप्त प्रस्ताव.

४) सुकाणू समितीच्या दिनांक १८.०६.२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

५) पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय, दि.२८.०८.२०२४

६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी, जि .रत्नागिरी यांचे पत्र क्र.रजिप/ ग्रापापु/लेखा-२/८२७/२०२६, दि.१६.०३.२०२६.

प्रस्तावना -

राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी, जि .रत्नागिरी यांच्यामार्फत सादर मौजे आगरनळ, ता. जि. रत्नागिरी येथील आगरनळ धनगरवाडी तलाव संवर्धन प्रकल्पास संदर्भ क्र.२ वरील दि.१३.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.८२.४९ लक्षच्या मर्यादेत तत्वत: मान्यता व त्यानुषंगिक रू.४१,२५,०००/- (रुपये एक्केचाळीस लक्ष पंचवीस हजार फक्त( इतका निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी, जि .रत्नागिरी यांना वितरित करण्यात आलेला होता. तदनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी,जि.रत्नागिरी यांनी विभागास सादर केलेला आगरनळ धनगरवाडी तलाव तलाव संवर्धनाचा रुपये ८२,४९,०००/- इतक्या रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवालास दि.१८ जून, २०२४ रोजी सुकाणू समितीने अंतिम मान्यता दिलेली होती. त्यानुषंगाने आगरनळ धनगरवाडी तलाव संवर्धन प्रस्तावास संदर्भ क्र.५ वरील दि.२८.०८.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये अंतिम प्रशासकीय मान्यता व दि.१३.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरित केलेले रुपये ४१,२५,०००/- इतका निधी खर्च करण्यास मंजूरी देण्यात आली होती.

आता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी त्यांच्या संदर्भ क्र.६ वरील दि.१६.०३.२०२६ रोजीच्या पत्रासोबत उपयोगिता प्रमाणपत्र, भौतिक प्रगती अहवाल, वित्तीय प्रगती अहवाल, ततीय पक्ष लेखापरिक्षण अहवाल, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्श्याची रक्कम जमा करून खर्च केल्याबाबतचे प्रमाणपत्र, कामांची छायाचित्रे सादर केली असून आगरनळ धनगरवाडी तलाव संवर्धनासाठी यापूर्वी वितरित केलेला एकूण रक्कम रूपये ४१,२५,०००/- (अक्षरी रूपये एक्केचाळीस लक्ष पंचवीस हजार फक्त) इतका निधी पूर्णपणे खर्च केला असल्याचे उपयोगिता प्रमाणपत्रात तसेच वित्तीय प्रगती अहवालात नमूद केले आहे. तसेच उर्वरीत कामे पूर्ण करण्यासाठी राज्य हिश्श्यापैकी अनुदानाचा उर्वरित निधी वितरीत करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. उपरोक्त कागदपत्रांच्या आधारे मौजे आगरनळ, ता. जि. रत्नागिरी येथील आगरनळ धनगरवाडी तलाव संवर्धनासाठी राज्य शासनाच्या हिश्श्यापैकी पुढील हप्ता म्हणून एकूण रक्कम रूपये २९,२७,८९५/- (अक्षरी रूपये एकोणतीस लक्ष सत्तावीस हजार आठशे पंच्यान्नव फक्त) इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी त्यांच्या दि.१६.०३.२०२६ रोजीच्या पत्रासोबत उपयोगिता प्रमाणपत्र, भौतिक प्रगती अहवाल, वित्तीय प्रगती अहवाल, ततीय पक्ष लेखापरिक्षण अहवाल, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्श्याची रक्कम जमा करून खर्च केल्याबाबतचे प्रमाणपत्र, कामांची छायाचित्रे सादर केली असून मौजे आगरनळ, ता. जि. रत्नागिरी येथील आगरनळ धनगरवाडी तलाव संवर्धनासाठी यापूर्वी वितरित केलेला एकूण रक्कम रूपये ४१,२५,०००/- (अक्षरी रूपये एक्केचाळीस लक्ष पंचवीस हजार फक्त) इतका निधी पूर्णपणे खर्च केला असल्याचे उपयोगिता प्रमाणपत्रात तसेच वित्तीय प्रगती अहवालात नमूद केले आहे. तसेच उर्वरीत कामे पूर्ण करण्यासाठी राज्य हिश्श्यापैकी अनुदानाचा उर्वरित निधी वितरीत करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. उपरोक्त कागदपत्रांच्या आधारे आगरनळ धनगरवाडी तलाव संवर्धनासाठी राज्य शासनाच्या हिश्श्यापैकी पुढील हप्ता म्हणून एकूण रक्कम रूपये २९,२७,८९५/- (अक्षरी रूपये एकोणतीस लक्ष सत्तावीस हजार आठशे पंच्यान्नव फक्त) इतका निधी वितरीत करण्यास तसेच सदर रक्कम खर्च करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांना मान्यता देण्यात येत आहे. याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे -

(रक्कम रूपये)

| अ.क्र | मौजे आगरनळ, ता. जि. रत्नागिरी येथील आगरनळ धनगरवाडी तलाव संवर्धन प्रकल्पाकरिता प्रशासकीय मान्यताप्राप्त रक्कम | राज्य शासन हिस्सा | संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा | यापूर्वी वितरीत करण्यात आलेला निधी | सध्या वितरीत करण्यात येत असलेला निधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | ८२,४९,०००/- | ७४,२४,१००/- | ८,२४,९००/- | ४१,२५,०००/- | २९,२७,८९५/- |

आगरनळ धनगरवाडी तलाव संवर्धनाचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रकल्प पूर्णत्त्वाचे प्रमाणपत्र, उपयोगिता प्रमाणपत्र, कामांची छायाचित्रे, स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा जमा व खर्च केल्याबाबतचे प्रमाणपत्र, इ. शासनास प्राप्त झाल्यानंतर राज्य शासनाच्या हिश्श्यापोटी उर्वरित (५%) रक्कम रू. ३,७१,२०५/- (अक्षरी रूपये तीन लक्ष एकाहत्तर हजार दोनशे पाच फक्त) इतकी रक्कम वितरीत करण्यात येईल.

२. राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत आगरनळ धनगरवाडी तलावाचे पर्यावरणीयदृष्ट्या संवर्धन करण्याच्या अनुषंगाने वाचा येथील अ.क्र.५ वरील शासन निर्णयातील “प्रपत्र-ब” मधील सर्व मार्गदर्शक तत्त्वे, अटी व शर्तींच्या अधीन राहून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांना खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी सदर निधी मंजूर कामांसाठी खर्ची करून उपयोगिता प्रमाणपत्रासह इतर आवश्यक कागदपत्रे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांना अदा करावयाची रूपये २९,२७,८९५/- (अक्षरी रूपये एकोणतीस लक्ष सत्तावीस हजार आठशे पंच्याऩ्नव फक्त) एवढी रक्कम अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६/२०/कोषा-प्रशा ५, दि.१२.११.२०२१ अन्वये ई-कुबेर प्रणालीद्वारे थेट मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचे बँक खाते Chief Accounts & Finance Officer Z P Ratnagiri, खाते क्र.००००००३७५३०६५८६७७, IFSC Code - SBIN०००४६७ भारतीय स्टेट बँक, शाखा-रत्नागिरी, जि.रत्नागिरी मध्ये जमा करावे. प्रस्तूत प्रकरणी श्री.किशोर मो. सोईतकर, कार्यासन अधिकारी, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व श्री.विशाल वि.मदने, उप सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांना नियंत्रक अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. सदर प्रयोजनार्थ होणारा खर्च हा मागणी क्र. यू-४, ३४३५ परिस्थितिकी व पर्यावरण ०४, प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण, १०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना -राज्य योजनांतर्गत योजना, (०२),पर्यावरण प्रतिबंध, (०२) (०७), राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना (३४३५ ०१८२), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या मुख्य- लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या वर्षासाठीच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली वर्गीकृत करण्यात यावा.

५. प्रस्तूत शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२६/प्रक्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९ एप्रिल, २०२६ तसेच वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार तसेच त्यातील अटी व शर्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहे. प्रमाणित करण्यात येते की, सदर दिनांक ०९ एप्रिल, २०२६ रोजीच्या शासन निर्णयाच्या परिशिष्टातील अनु.क्र. २ व ९ मधील अटींची पुर्तता होत आहे.

I) वित्त विभागाच्या उपरोक्त परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ९ मधील ३१ वेतनेतर सहायक अनुदाने या बाबीखालील खर्च करण्यास विभागाला अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील नमूद अटींची पूर्तता करण्यात आली आहे.

II) वित्त विभागाच्या उपरोक्त परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक १,३,४,५,६,७ व ८ या प्रकरणी लागू नाही. तसेच सदर परिशिष्टातील अनुक्रमांक ४ बाबत नमूद करण्यात येते की ही योजना केंद्र पुरस्कृत बाह्य सहाय्यित योजना नाही.

III) वित्त विभागाच्या उपरोक्त परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक २ च्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, सदर योजनेच्या स्वरुपात अथवा व्याप्तीमध्ये कसलाही बदल करण्यात आलेला नाही. तसेच परिशिष्टातील अ.क्र.९ संदर्भातील तपासणी सूचीमधील अनुक्रमांक १,२,३ व ४ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अटींची पूर्तता होत आहे. तसेच सदर अनुक्रमांक ९ संदर्भातील तपासणी सूचीमधील अनुक्रमांक ५ ते १० या प्रकरणी लागू नाही.

६. या शिवाय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०१६/प्र. क्र.३१/कोषा.प्रशा-५, दिनांक १०.०५.२०१६ अन्वये अनुक्रमांक "अ" मधील पुढील बाबींची पूर्तता होत आहे -

१) विभागास प्रदान वित्तीय अधिकाराबाबत वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र अर्थसं २०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३ दिनांक ०२.०४.२०१८ मधील परिच्छेद क्र.६ (अ) नुसार रु.५ कोटी पर्यंतच्या अनावर्ती योजनेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना आहेत.

२) **मौजे आगरनळ, ता. जि. रत्नागिरी येथील आगरनळ धनगरवाडी तलाव संवर्धनासाठी एकूण रक्कम रूपये २९,२७,८९५/- (अक्षरी रूपये एकोणतीस लक्ष सत्तावीस हजार आठशे पंच्यान्नव फक्त) इतका निधी प्रस्तुत शासन निर्णयादवारे वितरित करण्यात येत आहे. सदरनुसार देण्यात येणारे अनुदान सशर्त आहे. त्यानुसार सदर वितरित केलेला निधी खर्च झाल्याचे उपयोगिता**

**प्रमाणपत्र विभागास सादर केल्यानंतर राज्य शासनाच्या हिश्श्यापोटी उर्वरित निधी वितरीत करण्याच्या शर्तीसह वितरीत करण्यात येत आहे.**

३) "मागणी क्र.यु-४, ३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण, ०४, प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण, १०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०२) पर्यावरण प्रतिबंध (०२) (०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना (३४३५ ०१८२) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)"या मुख्य लेखाशिर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्याकडून पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास कोणतेही येणे बाकी नाही.

५) तसेच उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुक्रमांक "अ" मधील क्रमांक ६,७,८ व ९ येथील बाबी लागू नाहीत.

७. प्रस्तूत शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३४३/२०२६/व्यय-१६, दि.३०.०९.२०२६ यास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१००९१२४०२४५७०४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

RAMESH MURARI MANALE

Digitally signed by RAMESH MURARI MANALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Environment Department, 2.5.4.20=3AFDFF0BF288C02A1A4C514992D6AB6F28B31FCBD83BCCF465EC868151EE5BBD, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2A544F07211AC905895E246B961BC9981C480A91372BB58AE26124A46F104C47, cn=RAMESH MURARI MANALE
Date: 2026.10.09 12:41:04 +05'30'

**(रमेश मु. मनाळे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राज भवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल ) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव (पर्यावरण व वातावरणीय बदल), मंत्रालय, मुंबई
७. सह सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मंत्रालय, मुंबई.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी,जि .रत्नागिरी
९. महालेखापाल (लेखापरिक्षा) १. महाराष्ट्र मुंबई-४०००२०
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई- ४०००२०
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१२. महालेखापाल (लेखापरिक्षा) २. महाराष्ट्र, नागपूर

१३. अधिदान व लेखाधिकारी, वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१.
१४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१५. निवासी लेखाधिकारी, मुंबई
१६. संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई
१७. मुख्यलेखा परिक्षक, स्थानिक निधीलेखा, कोकण भवन, मुंबई
१८. वित्त विभाग (कार्यासन क्रमांक व्यय-१६/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई.
१९. नियोजन विभाग, कार्यासन क्र.१४७२, मंत्रालय, मंबई.
२०. रोखशाखा, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. निवडनस्ती (कार्यासन तां.क.३).